# माजी आमदार श्री बाबासाहेब पाटील सरूडकर शिक्षण संस्थेचे

# श्री शिव शाहू महाविद्यालय सरूड.

## अर्थशास्त्र विभाग आयोजित

## विषय - अर्थसंकल्प 2018 -2019

## अहवाल

दिनांक-07/02/2019 या दिवशी कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन व दीपप्रज्वलन सकाळी दहा वाजता. प्र. प्राचार्य डॉ. जी एच आळतेकर. प्रमुख पाहुणे प्रा. पी. बी. कांबळे. यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक - सहा.प्रा.पी.पी.देशमुख यांनी केले . आपल्या प्रास्ताविकामध्ये अर्थसंकल्पनाच्या पद्धती, उच्च शिक्षणातील बजेटचा दर्जा, शेती क्षेत्र व ग्रामीण विकास भारतातील सामाजिक सुरक्षितता, सेवा क्षेत्राच्या महत्त्व. इत्यादी विषयांवर थोडक्यात आढावा घेतला. यानंतर प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतात संकल्प आतील महत्त्वाच्या बाबींवरती प्रकाश टाकत त्यांनी कोणकोणत्या क्षेत्रात अर्थसंकल्पाला महत्त्वाचे स्थान दिले आहे आणि कोणत्या गोष्टी दुर्लक्षित आहेत हे सांगते त्यांनी त्या बाबी स्पष्ट करण्यात सुरुवात केली त्यामध्ये पहिली बाब शिक्षण क्षेत्राकडे दुर्लक्ष करीत उच्चशिक्षणातील दर्जा सुधारण्याचा सरकारचा मानस दिसून येतो. त्यामध्ये त्यांनी असे देखील सांगितले की शिक्षण ही एक अत्यंत महत्त्वाची सामाजिक सेवा असताना संपूर्ण शिक्षण क्षेत्राकडे आवश्यक अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर संपूर्ण संपूर्ण शिक्षण क्षेत्राची मूलभूतरचना , शिक्षक वेतन, मूलभूत रचना, विद्यार्थी शिष्यवृत्ती, विद्यार्थ्यांची गळती, सहभाग याबाबत ही त्यांनी भाष्य केले, त्याचबरोबर ग्रामीण शहरी व स्त्री पुरुष सामाजिक गटनिहायक, असमानता या बाबीवर भाष्य केले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती मा.प्रा. डॉ. जी एच आळतेकर. यांनी आपले मनोगतातून उच्च शिक्षणातील दर्जा सरकारचे प्रयत्न . विविध योजना. या विषयावरील आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे आभार सहा.प्रा.बी.एम.हासुरे यांनी मांडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा.प्रा.एस.एच.पिरजादे . यांनी केले.